पुण्य नगरी ४
बुधवार, ११ मे २०२२

# ‘विवेकानंद’ : उद्या युवा साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळातर्फे दि. १२ मे रोजी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे सकाळी ९.३० वाजता दुसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी वामन पंडित यांच्या हस्ते आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

5/2022

PS
11-5-22

तरुण भारत
बुधवार, ११ मे २०२२

# विवेकानंदमध्ये उद्या युवा साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या वतीने गुरुवार, १२ रोजी सकाळी ९.३० वाजता राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. हे संमेलन महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे होणार आहे. याचे उद्घाटन ज्येष्ठ कवी वामन पंडीत (कणकवली) यांच्या हस्ते होईल. स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आहेत. फिंद्री पुस्तकाच्या लेखिका डॉ. सुनीता बोर्डे यांची प्रकट मुलाखत होईल. तर डॉ. जयप्रभू कांबळे (गोवा) यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन होईल. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संमेलनासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. प्रभा पाटील यांनी केले आहे.